REGISTERED No. B 3434

जाहिरातींचे दर.
खालील पत्त्यावर चौकशी करावी.
व्यवस्थापक, अर्थ,
'दुर्गाधिवास', पुणें ४.

# अर्थ

वर्गणीचे दर.
वार्षिक वर्गणी
रु. ४.
(टपाल हशील माफ
किरकोळ अंकास
एक आणा.

'अर्थ एव प्रधानः' इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति।
—कौटिलीय अर्थशास्त्र.

संपादक—प्रो. वा. गो. काळे.

वर्ष ४ | पुणें, बुधवार, तारीख २४ ऑगस्ट, १९३८ | अंक ३४

'यश आलेंच पाहिजे.
मग महाराष्ट्रीय कमले?'
अशा स्वाभिमानी महाराष्ट्रीयांच्या आर्थिक साहाय्यानें सर्व मशिनरी आली, उभारणीला सुरुवात झाली, ५०० एकर उंसाची लागवड करतां आली.
तारीख १० जानेवारी १९३९च्या
मकर—संक्रमणाला
बृहन्महाराष्ट्रीय साखर
व
१२५० एकर उंसाची नवी लागवड
यशाला मदत व दरसाल ५॥ टक्के व्याज व दोन वर्षांनीं रक्कम परत. डिपॉझिट रकमा घेण्यास बोर्डानें मंजूरी दिली आहे.
रा. ब. काकासाहेब सहस्रबुद्धे, डॉक्टर रा. ह. भडकमकर M.A., M.D. रा. ब. वि. रु. मुळ्ये इंदोर, रा. ब. रावजी जनार्दन भिडे यांच्या अभिप्रायांसह सविस्तर माहिती खालील पत्त्यावर मिळेल.
दि बृहन्महाराष्ट्र शुगर सिंडिकेट लिमिटेड, पुणें.
२४७ बुधवार पेठ, पुणें २, बेलबागेसमोर.

संजीवन हेअर टॉनिक
दारुणा, केंस गळणें व टक्कल ह्यावर अनुभविक उपाय
संजीवन मॅन्युफॅक्चरिंग कं., अहमदाबाद

पायोनियर डाइंग हाऊस, पुणें,
रंगीत कापडाचे व चिटाचे व्यापारी.
पक्का रंग, बडीकाम, पक्क्या रंगाचे ... व रंग देण्याचा कारखाना.
भिकारदास मारुतीरोड, 'दांतेवाडी' ६४५ सदाशिव पेठ.

For All Medical Requisites
— TRY —
N. MAHADEV & Co.
DISPENSING CHEMISTS
AND
DRUGGISTS
City Post Office Corner Poona 2

# दि बँक ऑफ महाराष्ट्र लि.

अधिकृत भांडवल १०,००,००० | विक्रीस काढलेलें भांडवल ५,००,०००
खपलेलें भांडवल २,३४,४५० | वसूल झालेलें भांडवल १,१७,१६५

सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात. सेव्हिंग्ज खात्यावर चेक्स काढतां येतात. या बँकेवरील चेक मुंबईला सेंट्रल बँक ऑफ इंडिया लि. मार्फत कमिशनशिवाय वसूल केले जातात. बँकेचे नियम, व्याजाचे दर व शेअर बद्दल बँकेकडे चौकशी करावी.

M. V. GOKHALE,
मॅनेजर.

काकाकुवा मॅन्शन, लक्ष्मीरोड, पुणें २.

# विविध माहिती

### औद्योगिक बांधे

१९३७ साली मुंबई प्रांतांत एकूण ३७९ औद्योगिक बांधे उपस्थित झाले आणि त्यांत ६½ लक्ष कामगार गुंतले. ह्या बांध्यांपैकीं २३४ म्हणजे शेकडा ६२ बांधे मजुरींच्या दराबाबत होते. ३६६ बांध्यांमध्यें तडजोड घडून आली, त्यांपैकीं शेकडा ४६ प्रसंगीं कामगारांस ज्यास्त सवलती मिळाल्या. शेकडा १४ बांध्यांत त्यांचा पूर्ण विजय झाला.

### ट्रेझरी बिलांवर ९ आ. ८ पै व्याजाचा दर

रिझर्व्ह बँकेनें हिंदुस्थान सरकारचीं २ कोटि रुपयांचीं ट्रेझरी बिलें गेल्या आठवड्यांत विकलीं, त्यांवर व्याजाचा सरासरी दर द. सा. द. शे. ९ आ. ८ पै इतका पडला.

### दक्षिणी स्त्रियांकरितां सहकारी दुकान

दक्षिणी स्त्रियांत दुकानदारीची आवड निर्माण करून त्यांस सहकारी चळवळीचें महत्त्व पटवून देण्याकरितां, मुंबई येथें एक स्टोअर्स काढण्याचें घाटत आहे. ह्या दुकानामध्यें केवळ दक्षिणी स्त्रियाच व्यवस्थापकांचें आणि विक्रेत्यांचें काम करतील; वस्तु विकत घेण्यास कोणींहि येण्यास प्रत्यवाय नाहीं, अशी ही योजना आहे.

### कपाशीच्या लागवडीचा अंदाज

१९३८-३९ च्या मोसमांतील हिंदुस्थानांतील कपाशीच्या लागवडीचा पहिला सरकारी अंदाज प्रसिद्ध झाला आहे. त्यावरून एकूण १ कोटि, ५८ लक्ष एकरांत कपास पेरली असून, हें क्षेत्रफळ मागील वर्षांतील क्षेत्रफळाचे मानानें शेकडा तीन टक्क्यांनीं अधिक आहे असें समजतें.

### मुंबई आणि सिंध प्रांतांतील आय. सी. एस. अधिकारी

मुंबई आणि सिंध प्रांत ह्यांत मिळून एकूण १२२ आय. सी. एस. अधिकारी आहेत. ह्यांपैकीं ५९ हिन्दी आहेत.

### कालिकत बँक लि.

मलबारमधील बँकांस सध्या बरीच झळ लागली असून त्यांनीं कर्जें देण्याचें काम मर्यादित केलें आहे. कालिकत बँक नुकतीच बंद पडली आहे. तिच्या मद्रास प्रांतांत आणि सिलोनमध्यें अनेक शाखा आहेत. तिचें भरणा झालेलें भांडवल ५ लक्ष रुपये असून रिझर्व्ह फंड १½ लाखाचा आहे. १९३७ सालीं तिचेकडे १९ लक्ष रुपयांच्या ठेवी होत्या आणि तिनें ६ टक्के दरानें डिव्हिडंड दिलें होतें.

### कच्चा माल आणि खाद्य पदार्थ ह्यांचा साठा

अडचणींचे प्रसंगीं उपयोगी पडावा, म्हणून ब्रिटिश साम्राज्यांतील कच्चा माल आणि खाद्य जिन्नस ह्यांचा साठा करून ठेवण्याचें ब्रिटिश सरकारनें ठरवावें, असें मि. मेनार्ड कीन्स ह्यांनीं आपल्या एका भाषणांत सुचविलें. ६५० कोटि रुपये किंमतीचा माल अशा रीतीनें साठविण्यास दरसाल २६ कोटि रुपये इतका खर्च ब्रिटिश सरकारास येईल.

### ग्रेटब्रिटनमधील मोटारमालकांची संस्था

ग्रेटब्रिटनमधील ऑटोमोबाइल असोसिएशनच्या सभासदांची संख्या १ लक्ष, १२ हजारांवर आहे. गेल्या एका वर्षांत तिचे ४८ हजार नवीन सभासद झाले. सुमारें ६० हजार सभासदांस असोसिएशननें कायद्याचे कामांत सहाय केलें. वेगवेगळ्या रस्त्यांचे १२ लक्ष नकाशे तिनें सभासदांस पुरविले आणि ७५ हजार सभासदांस वैद्यकीय मदत दिली.

### त्रावणकोर बँकेचें अपील नामंजूर

क्विलॉनच्या डिस्ट्रिक्ट जजानें त्रावणकोर नॅशनल ॲन्ड क्विलॉन बँक गुंडाळण्यांत यावी असा हुकूम दिला होता. ह्याविरुद्ध बँकेनें त्रावणकोर हायकोर्टांत अपील केलें, तें हायकोर्टानें खर्चासुद्धां फेटाळून लावलें.

### धनिकांच्या संपत्तीचा सार्वजनिक उपयोग

सर दोराबजी टाटा ट्रस्ट, सर रतन टाटा चॅरिटीज आणि लेडी टाटा मेमोरिअल ट्रस्ट ह्या तीन ट्रस्टसच्या विश्वस्तांनीं १९३३-३७ ह्या मुदतींत २४½ लक्ष रुपये धर्मादाय कार्याकरितां देणगी म्हणून दिले. लेडी टाटा मेमोरिअल ट्रस्टमधून १ लक्ष ५६ हजार रुपये परदेशांत वैद्यकीय उच्च शिक्षण घेणारांस मिळाले. त्यांपैकीं ५७ हजार रुपये हिंदी विद्यार्थ्यांच्या वांट्यास आले. बाकीच्या दोन ट्रस्टसमधून देण्यांत आलेल्या देणग्यांपैकीं शेकडा ९९ इतकी रकम हिंदुस्थानांतील कार्यासच मिळाली.

### बिहार प्रांतिक सहकारी बँकेची विभागणी

बिहार आणि ओरिसा हे प्रांत आतां विभक्त झाले असून, जुन्या संयुक्त प्रांतिक सहकारी बँकेच्या विभागणीची योजना चालू आहे. ह्या बँकेच्या पैशाची ठेवींचे प्रमाणांत बिहार आणि ओरिसा ह्या प्रांतांमध्यें वांटणी व्हावी अशी बिहारची मागणी आहे. बँकेनें दिलेल्या कर्जांच्या रकमेचे प्रमाणांत विभागणी व्हावी, असें ओरिसाचें म्हणणें आहे. रिझर्व्ह बँकेच्या एका अधिकाऱ्याकडे ह्या प्रश्नाचा विचार करण्याचें काम सोपविण्यांत आलें होतें. त्याच्या रिपोर्टाचा विचार गेल्या आठवड्यांत करण्यांत आला.

### कर्जत तालुक्यांत सारासूट

१९३४-३५ ते १९३६-३७ ह्या तीन वर्षांबाबतच्या साऱ्यांत कर्जत ( जि. कुलाबा ) तालुक्यास रुपयास दोन आणे सूट देण्यांत आली होती. १९३७-३८ च्या साऱ्यांतहि अशी सूट देणें आवश्यक आहे कीं काय हें ठरविण्यास मदत व्हावी म्हणून मुंबई सरकारनें एका मुलकी अधिकाऱ्याची चौकशीचे कामीं नेमणूक केली आहे. ह्या अधिकाऱ्यानें शक्य तेवढ्या लवकर कुलाबा जिल्ह्याचे कलेक्टर आणि दक्षिण विभागाचे कमिशनर ह्यांचे मार्फत आपला रिपोर्ट सरकारास सादर करावयाचा आहे.

### हिंदुस्थानांतील गव्हाचें पीक

हिंदुस्थानांतील गव्हाच्या पिकाचा १९३७-३८ चा अखेरचा अंदाज खालीलप्रमाणें आहेः—

गव्हाखालील एकूण क्षेत्रः—३ कोटि, ५७ लक्ष एकर

गव्हाचें उत्पादनः—१ कोटि, ८ लक्ष टन. म्हणजे, पिकाचे क्षेत्रफळांत आणि उत्पादनांत गेल्या वर्षापेक्षा अनुक्रमें ७ टक्क्यांनीं आणि १०½ टक्क्यांनीं वाढ दिसून येते.

### चेक्सची देवघेव

मुंबई येथील बँकर्स क्लिअरिंग हाउसमध्यें १८ आगस्ट रोजीं संपलेल्या आठवड्यांत ११ कोटि, ५ लक्ष रुपये किंमतीच्या ८४,६७२ चेक्सची देवघेव झाली.

### बीर दारूचा खप

गेल्या सालीं सबंद जगांत मिळून एकूण ३८ अब्ज पिंट बीर दारू खपली. हा आकडा त्यापूर्वीच्या सालांतील खपाचे आकड्यापेक्षा २ अब्जांनीं मोठा आहे.

### मुंबई बंदरांतून सोन्याची साप्ताहिक निर्गत

| | किंमत रुपये |
|---|---|
| ७-८-३८ ते १३-८-३८ | ४७,४८,२४१ |
| १४-८-३८ ते २०-८-३८ | २०,४४,१०२ |
| २१-९-३१ ते २०-८-३८ | ३,१९,१८,०१,३८७ |

अनुक्रमणिका

| | पृष्ठ |
|---|---|
| १ विविध माहिती ... | ४१० |
| २ खंडकरी कायद्याच्या दोन बाजू | ४११ |
| ३ बँकांतील ठेवींचा विना कसा उपयोगी होणार ! | ४१२ |
| ४ स्फूट-विचार ... इंग्लंडमध्यें फुकट लष्करी शिक्षण—उच्च शिक्षण, बेकारी आणि सरकारचें कर्तव्य-मोटारींच्या वहातुकीचा वाढता विस्तार-अंगवळणीं पडलेला कान्तिकारक फेरबदल—व्यापारी कराराच्या वाटाघाटी—कपाशीच्या उत्पादनांत वाढ. | ४१३ |
| ५ शास्त्रीय शिक्षणास व्यवहाराची जोड पाहिजे | ४१५ |
| ६ सहकारी चळवळ ... | ४१६ |
| ७ महाराष्ट्र चेंबरची वार्षिक सभा | ४१७ |
| ८ प्राप्तीवरील कराबाबत कायद्याची दुरुस्ती | ४१८ |
| ९ निवडक बाजारभाव | ४१९ |

अर्थ

बुधवार, ता. २४ ऑगस्ट, १९३८

## खंडकरी कायद्याच्या दोन बाजू

प्रांतिक विधिमंडळापुढें येणाऱ्या खंडकरी कायद्याचा मसुदा सरकारनें प्रसिद्ध केला असून त्याचा सारांश आम्हीं "अर्था"च्या मागील अंकांत दिला आहे. बिलांतील मूलभूत कलमांवर दोन विरुद्ध दिशांनीं प्रतिकूल टीका होत आहे हें जमीन-मालक आणि खंडकरी ह्यांच्या परस्पर-संबंधाचें तडजोडीच्या पद्धतीनें रक्षण त्या योगानें होत असल्याचें स्पष्ट लक्षण आहे. अशा प्रकारचा कायदा होत असतां परस्पर-हितसंबंधी लोकांनीं अगर त्यांच्या पुरस्कर्त्यांनीं दोन विरुद्ध बाजूंनीं ताणून धरावें हें स्वाभाविक आहे. हा कायदा करण्याचें आज काय कारण आहे आणि त्याच्या योगानें आमच्या परंपरागत मालकी हक्कावर गदा येत आहे ती आणण्याचा सरकारला काय अधिकार आहे असें जमीन मालकांनीं म्हणावें आणि ह्या कायद्यानें खंडकऱ्यांचें असें काय हित होत आहे व त्यांत जमीनदारांचेंच संरक्षण होण्याची तजवीज केलेली नाहीं काय ? अशी खंडकऱ्यांच्या वतीनें ओरड व्हावी, ही परिस्थिति विचार करण्यासारखी आहे. जमिनीच्या मालकीचा हक्क असा कांहीं सर्वव्यापी व अबाधित नाहीं कीं मालक आणि कुळें ह्यांच्या परस्पर-संबंधाचें नियमन करण्याचा प्रयत्न बेकायदेशीर व्हावा, ही गोष्ट जमीनदारांनीं लक्षांत ठेवली पाहिजे. आर्थिक व सामाजिक संबंधांच्या नियमनाचे अलीकडचे सर्व कायदे त्याविषयीं सरकारास असलेल्या अधिकाराच्या योग्य आणि तत्वमान्य पायावर आधारलेले आहेत आणि त्या नियमाला प्रस्तुत खंडकरी कायदा अपवाद नाहीं हें त्यांनीं विसरून चालणार नाहीं. खंडकरीपणाची शाश्वती निर्माण झाली असतां शेतीचें काम करणाऱ्या पण स्वतःची मुळींच जमीन नसणाऱ्या किंवा ती अपुरी असणाऱ्या लोकांस निश्चित धंदा मिळून समाजहित साधेल ह्या बुद्धीनें केला जाणारा होऊं घातलेला कायदा हा एक प्रयोग आहे. आपला मालकी हक्क मात्र मर्यादित होऊन हा हेतु साध्य होण्याच्या मार्गांत येण्यासारख्या अडचणी जमीनदारांनीं दाखवाव्या आणि त्याप्रमाणें प्रस्तुत बिलांत दुरुस्त्या सुचवाव्या हें योग्य आहे. कायदा करण्याच्या त्याच्या मूलभूत हेतूस विघातक नसणाऱ्या सूचनांचा सरकारनेंहि काळजीपूर्वक विचार केला पाहिजे. जमिनीच्या मालकी हक्काशी कांहीं सामाजिक जबाबदाऱ्या निगडित झालेल्या असतात, त्या आपण कितीशा ओळखतों हें मालकांनीं स्वतःस प्रामाणिकपणानें त्याचप्रमाणें विचारावें. जमिनीची संपत्ति मर्यादित असून समाजाच्या धारण-पोषणाच्या दृष्टीनें तिची मालकी ही जिव्हाळ्याची गोष्ट झालेली आहे. तेव्हां राज्यकर्त्यांनीं आणि इतर लोकांनीं ह्या बाबतींत ढवळाढवळ करणें अयोग्य आहे असें त्यांनीं म्हणणें वाजवी होणार नाहीं. स्वतःच्या हक्कांचें संरक्षण झालें पाहिजे अशी मागणी त्यांनीं सामाजिक हिताच्या व्यापक भूमिकेवरच केली पाहिजे.

खंडकरी कायद्याच्या मसुद्यावर दुसऱ्या बाजूनें टीका होत आहे तिचें निरीक्षण ह्याच व्यापक दृष्टीनें केलें पाहिजे. सर्व स्थितींतल्या जमीन मालकांच्या सर्व कुळांस कायदा लागू झाला पाहिजे किंवा त्याचे योगानें जमिनीची मालकी खंडकऱ्यांकडे अबाधितपणानें गेली पाहिजे किंवा त्याचा उपयोग संपत्तीच्या सध्याच्या वांटणींत व तिच्या पद्धतींत महत्त्वाचा बदल घडवून आणण्याकडे झाला पाहिजे हे उद्देश बिलाच्या मुळाशी नाहींत ही गोष्ट प्रथम स्पष्ट होणें अगत्याचें आहे. फॅक्टरी कायदेहि लहान कारखान्यांस आणि सर्व कामगारांस सारखेच लागू करण्यांत येत नाहींत हें येथें लक्षांत ठेवलें पाहिजे. ह्या कायद्यांत अनेक वर्षें क्रमाक्रमानें सारख्या सुधारणा होत आल्या आहेत. प्रस्तुत खंडकरी कायदा हा जमिनीसंबंधाच्या कायद्याचा उपक्रम आहे. त्यांत अनुभवानें सुधारणा होण्याची आवश्यकता भासेल तिला अनुसरून पुढें फेरफार करावे लागतील. नुसतें खंडाच्या वसुलीकडे लक्ष ठेवून जमिनीच्या मशागतीकडे किंवा सुधारणेकडे न पाहणारे मालक कोण आणि किती आहेत हें ठरविणें कठीण आहे. त्याचप्रमाणें, प्रत्येक जमीन-मालक शेतीची अनास्था करणारा आणि कुळांवर जुलूम करणारा मनुष्य आहे असेंहि गृहीत धरतां येणार नाहीं. ह्यासाठी कोठें तरी कायद्याची मर्यादा घातली पाहिजे. ठरलेला खंड वेळेवर देणें, जमिनीची खराबी न करणें इत्यादि नियंत्रणें खंडकऱ्यांवर घालण्यांत आलीं आहेत तीं आवश्यक नाहींत असें कसें म्हणतां येईल ? खंडकऱ्यांस देण्यांत येणारें संरक्षण जमीन-मालकांच्या दृष्टीनें अनावश्यक पण वस्तुतः मर्यादित आहे, हें स्पष्टच आहे. मालक स्वतः जातीनें जमीन वाहूं इच्छित असला, किंवा खंडकरी खंड देत नसला किंवा जमिनीची निगा नीट राखीत नसला तरीहि खंडकऱ्याच्या हातांत जमीन रहावी अशी अपेक्षा करणें सयुक्तिक व न्याय्य होणार नाहीं. शेतीची परिस्थिति ठिकठिकाणीं इतकी भिन्न भिन्न आहे कीं खंडाची रकम कायद्यानें निश्चित करणें सोपें नाहीं. बिलामध्यें नमूद असलेली ह्या बाबतची योजनाच तूर्त तरी निदान ग्राह्य समजली पाहिजे. मोठमोठे कारखानदार किंवा जमीनदार ह्यांच्याशीं ह्या इलाख्यांतील सामान्य जमीन-मालकांची तुलना करणें अप्रयोजकपणाचें आहे.

जमीन मालकीची आज जी वांटणी दिसत आहे आणि मालक, खंडकरी आणि मजूर ह्यांची जी वर्गवारी दिसत आहे तिला वारशाचे कायदे आणि आर्थिक परिस्थितींत झालेल्या उलाढाली हीं कारणीभूत आहेत. शिक्षण व उद्योगधंदे ह्यांचा

अभाव, शेतीचा विनकिफायतशीरपणा, लोकसंख्येंत वाढ आणि उत्पादनाच्या साधनांचा तुटवडा ह्यांमुळें सध्याची स्थिति उद्भवली आहे. ती नुसत्या कायद्याच्या जोरावर बदलूं पहाणें वेडेपणाचें आहे. जमिनीचे तुकडे उडाले आणि लोकांस कसण्यास स्वतःची जमीन नाहीं ह्याची जबाबदारी सर्व समाजावर व पर्यायानें सरकारवर आहे. जमीन मालकीच्या वांटणींत क्रांतिकारक बदल करावयाचे असतील तर संबंधी लोकांची नुकसान-भरपाई करून ते घडवून आणावे लागतील. ग्रेटब्रिटनमधील दगडी कोळशाच्या खाणींचें उदाहरण घ्या. अनेक मालकांच्या खाणी ठिकठिकाणीं पसरल्याकारणानें खाणींचा धंदा व्यवस्थित चालणें, कामकऱ्यांस वाजवी मजुरी मिळणें, कोळशाची निर्गत फायदेशीर होणें ह्या गोष्टी साध्य होत नाहींत, हें पाहून ब्रिटिश सरकारनें कमिशनमार्फत ह्या प्रश्नाची चौकशी करून खाणींच्या मालकांस त्यांच्या मालकीहक्काबद्दल द्यावयाच्या नुकसान-भरपाईची रकम निश्चित करवली आणि ते हक्क त्यांचेपासून विकत घेण्याचें ठरवलें. खाजगी मालमत्ता कायदेशीर आणि अबाधित अशी समजण्यांत येत आहे, तोंपर्यंत तिच्यावर हल्ला करणें हा जुलूम होईल. राष्ट्रीय व सामाजिक हिताच्या दृष्टीनें मालकी हक्कांचें नियमन करणें वेगळें आणि त्यांस मानण्याचें कारण नाहीं असें समजून ते नाहींसे करूं पहाणें वेगळें. मुंबईच्या सरकारचा उद्देश ह्या दुसऱ्या प्रकारचा नाहीं हें जाहीर करण्यांत आलें आहे आणि खंडकरी कायद्याचे बाबतींत पहिल्या प्रकारच्या हेतूनेंच सरकार प्रेरित झालें आहे असें समजलें पाहिजे. खंडकरी कायद्याचा मसुदा उघडउघड तडजोडीच्या स्वरूपाचा आहे.

## बँकेंतील ठेवींचा विमा कसा उपयोगी होणार ?

बँका बंद पडल्यामुळें ठेवीदारांचें होणारें नुकसान वांचविण्यासाठी त्यांच्या ठेवी परत मिळाव्या अशी योजना विम्याचे तत्त्वावर करतां येणें शक्य आहे. अमेरिकेंत ह्या प्रकारचा विमा अस्तित्वांत असून त्यानें गेल्या चार वर्षांत ३ लक्ष,६५हजार ठेवीदारांस ११¾ कोटि डॉलर्स देऊन त्यांचें नुकसान भरून टाकलें आहे. अमेरिकेमध्यें १९२० ते १९३३ ह्या मुदतींत १६,८०० बँका बंद पडल्या आणि त्यामुळें ठेवीदारांचें ६०० कोटि डॉलर्स बुडाले. एकट्या १९३३ सालींच ४,००० बँकांचें दिवाळें वाजलें. अमेरिकन सरकारनें बँक डिपॉझिट इन्शुअरन्सची म्हणजे ठेवीदारांच्या ठेवींच्या विम्याची योजना अंमलांत आणून ह्या आपत्तीची तीव्रता कमी केली आहे. सरकारच्या पुरस्कारानें फेडरल डिपॉझिट इन्शुअरन्स कॉर्पोरेशनची स्थापना करण्यांत आली.त्यास सरकारनें आणि फेडरल बँकांनीं ३० कोटि डॉलर्स भांडवल पुरविलें. ही रकम रोख्यांत गुंतविण्यांत आली असून, तिचेपासून दरसाल १ कोटि डॉलर्स उत्पन्न मिळतें. देशांतील सर्व बँकांनीं आपल्या ठेवींच्या एक बारांशाइतकी रकम ह्या कॉर्पोरेशनकडे ठेवावी, असा कायदा करण्यांत आला. कॉर्पोरेशनला स्वतःचे रोखे काढण्याचाहि अधिकार देण्यांत आला. एकादी बँक बंद पडल्याचें कॉर्पोरेशनला समजतांच तिचे प्रतिनिधी त्या बँकेमार्फत ठेवीदारांची रकम चेकचे द्वारा देण्याची व्यवस्था करतात. बंद पडलेल्या बँकेकडील ठेवीदारांचीं येणीं कॉर्पोरेशन स्वतःकडे घेते आणि रिसीव्हरकडे तीं सादर करून मिळेल ती रकम जमा करते. अशा रीतीनें अमेरिकेंतील १३,७९७ बँकांचा विमा उतरलेला आहे. अशाच प्रकारची योजना हिंदुस्थानांत करावी, असें एका लेखकानें "टाइम्स ऑफ इंडियांत" सुचविलें आहे. हिंदुस्थान सरकारनें पुढाकार घेऊन एका डिपॉझिट इन्शुअरन्स कंपनीची स्थापना करावी, म्हणजे हिंदी बँकिंगची प्रगति सुलभ होईल, असें त्याचें म्हणणें आहे. १०० लक्ष रुपये भांडवलापैकी ५० लक्ष रुपये मध्यवर्ती आणि प्रांतिक सरकारांनीं द्यावे, २५ लक्ष रुपयांची तरतूद रिझर्व्ह बँकेनें करावी आणि बाकी २५ लाख रुपये शेड्यूल्ड बँकांनीं जमा करावे, अशी त्याची योजना आहे. जरूर पडल्यास ह्या कंपनीस ५० लक्ष रुपयांचीं डिबेंचर्स उभारण्यास परवानगी असावी आणि शेड्यूल्ड बँकांनीं आपल्या ठेवींपैकी रुपयांत एक आणा ह्या कंपनीकडे द्यावा, असेंहि त्यानें सुचविलें आहे. असें झालें, म्हणजे प्रत्येक ठेवीदाराच्या ठेवीचा कमाल ५ हजार रुपयांपर्यंत विमा उतरवितां येईल. पुढें मांडलेले विचार ह्या संबधांत ध्यानांत घेणें अगत्याचें आहे. ही योजना बँका चालू असतां त्यांचें स्थैर्य वाढवण्याकरितां नसून त्या बुडाल्या असतां करावयाच्या व्यवस्थेसंबंधानें आहे हें येथें लक्षांत ठेवलें पाहिजे. "मरणं प्रकृतिः शरीरिणाम् विकृतिर्जीवितमुच्यते बुधैः" अशी व्यवस्था बँकांची नाहीं आणि असतां कामा नये. ह्या योजनेनें, अव्यवस्थितपणानें चालणाऱ्या बँकांच्या अनिष्ट व्यवहारांस आळा बसणार नाहीं. कदाचित् त्यांस उत्तेजनहि मिळेल अशी भीति आहे. मुळांत मजबुती असूनहि कांहीं बँकांवर विशिष्ट कारणांमुळें आपत्ति आल्यास त्यांस तात्कालिक सहाय मिळण्याचीच व्यवस्था मुख्यत्वेंकरून हवी आहे. त्यांच्या जिवंतपणीं आरोग्यरक्षणाची तरतूद पाहिजे आहे, मृत्यूचा विमा नको आहे. सुचवलेला विमा हा चांगल्या बँकांस एक प्रकारचा भुर्दंडच होईल आणि आज नाहीं उद्यां सर्व बँका बुडणार ही समजूत त्याच्या बुडाशीं राहील. लोकांची जबाबदारीची जाणीवहि शिथिल होईल आणि एकंदरीनें समाजाचें त्या योगें अनहितच होईल.

## १९४१ च्या शिरगणतीची पूर्वतयारी

१९४१ सालीं करावयाच्या शिरगणतीसाठी सबंद हिंदुस्थानाकरितां एक, आणि सर्व प्रांतांसाठी प्रत्येकी एक, असे आय. सी. एस. अधिकारी नेमण्यांत आले आहेत. हिंदुस्थानांतील खानेसुमारी म्हणजे जगांतील लोकसंख्येच्या एक पंचमांशाइतक्या लोकांची गणति होय. ह्यावरून ह्या कार्याच्या अवाढव्यतेची कल्पना येईल. १९४१ सालीं हिंदुस्थानची लोकसंख्या ४० कोटींवर जाईल अशी अपेक्षा आहे. लोकांस कोणते प्रश्न विचारावयाचे, ते प्रथम निश्चित करावे लागतील. चौकशीचें आणि नंतरचें गणतीचें काम करण्याकरितां सुमारें २० लक्ष सहायकांची जरूरी लागेल. ह्या कामासाठी लागणाऱ्या कागदाची तरतूद आतांपासूनच करण्यांत येत आहे. गेल्या खानेसुमारीस ४५ लक्ष रुपये खर्च आला होता.

### सैनिकांच्या दातांचे रोग

हिंदुस्थानांतील ब्रिटिश आणि हिंदी सैनिकांमधील दंतरोगाच्या प्रमाणाबाबत खालील आकडे मध्यवर्ती असेंब्लींत सांगण्यांत आले. १९३७ सालीं २३½ हजार ब्रिटिश सैनिकांस दातांच्या रोगासाठी उपाय करण्यांत आले. हिंदी सैनिकांपैकी फक्त १९० सैनिकांसच दंतवैद्याच्या सहायाची गरज भासली.

# स्फुट विचार

## इंग्लंडमध्यें फुकट लष्करी शिक्षण आणि हिंदुस्थानांत ?

ह्या देशांतील सर्व जातींच्या लोकांस लष्करी शिक्षण मिळण्याची सोय व्हावी आणि लष्करी अधिकाऱ्यांचें शिक्षण स्वस्त आणि सवलतीचें करावें म्हणजे लायक पण गरीब तरुणांस सैन्यांत प्रवेश मिळूं शकेल अशा आशयाच्या सूचना हिंदुस्थान सरकारास कित्येक वर्षें करण्यांत येत आहेत. ग्रेट ब्रिटनमध्यें लढाऊ रक्षणाची तरतूद मोठ्या प्रमाणांत तातडीनें सध्या करावी लागत असल्या कारणानें सैन्यांत आणि आरमारांत नोकरी करणारांस पगार, बढती, पेन्शन इत्यादि बाबतींत भरपूर सवलती देण्याचें नवें धोरण ब्रिटिश सरकारनें अंगिकारिलें आहे. ह्यांत विशेष लक्षांत ठेवण्यासारखी ही गोष्ट आहे कीं वूलिच आणि सँढर्स्ट येथील लष्करी कॉलेजांतला खर्च न झेपल्यामुळें गरीब आणि सामान्य स्थितींतल्या कुटुंबांमधील मुलांस तेथें प्रवेश मिळण्याची मारामार होई. ह्या योगानें लष्करी अधिकाऱ्यांचा पेशा श्रीमान लोकांतच मर्यादित असे. आतां कोणत्याहि लायक तरुणास ह्या लष्करी संस्थांत शिरून शिक्षण घेण्यास पैशाची अडचण पडणार नाहीं. लायक उमेदवारास लष्करी शिक्षण सर्वस्वी मोफत मिळण्याची सोय ब्रिटिश सरकारनें केली आहे. कपडे, सामान, फी, रहाण्याचा व जेवण्याचा खर्च इत्यादि सर्व बाबींविषयींची सांपत्तिक जबाबदारी सरकार स्वतःच्या अंगावर घेणार आहे आणि खर्चाचा यत्किंचितहि बोजा विद्यार्थ्यांच्या आईबापांवर पडणार नाहीं. लष्करी शिक्षण आणि नोकऱ्या ह्यांविषयींची हिंदी जनतेची निष्फळ ओरड कोणीकडे आणि ग्रेटब्रिटनमधली मोफत लष्करी शिक्षणाची व नोकरीच्या सवलतींची योजना कोणीकडे ? ह्या विलक्षण तफावतीचें समर्थन हिंदुस्थान सरकार कसें करणार ?

---

## उच्च शिक्षण, बेकारी आणि सरकारचें त्याबाबत कर्तव्य

मुंबई विश्वविद्यालयाचा पदवीदान समारंभ गेल्या आठवड्यांत पार पडला, त्या प्रसंगीं विश्वविद्यालयाचे उप-कुलगुरु, श्री. विठ्ठलराव चंदावरकर, ह्यांनीं भाषण केलें. मुंबई प्रांत शास्त्रीय शिक्षणाचे बाबतींत थोडासा मागसलेला असल्याचें त्यांनीं कबूल केलें. तथापि, उच्च शिक्षण आणि शास्त्रीय शिक्षण ह्या बाबतची आपली जबाबदारी मुंबई सरकार दूर सारणार नाहीं, अशी आशा त्यांनीं व्यक्त केली. विश्वविद्यालयीन शिक्षणाचा खर्च सरकारावर पडूं नये, ज्याची ऐपत असेल त्यानें हें शिक्षण घ्यावें, ह्या प्रकारची भूमिका सरकारनें धारण करावी, अशा कल्पनांनीं सध्याचें वातावरण भरलें आहे. प्रांतांतील सर्व लोकांच्या शैक्षणिक गरजांकडे लक्ष पुरविण्याची जबाबदारी सरकारावर आहे आणि हें कार्य मर्यादित खर्चांतच करणें अपरिहार्य आहे, ही गोष्ट येथें ध्यानांत घेतली पाहिजे. उच्च शिक्षणावर सरकारनें किती खर्च करावा, ह्याविषयींच केवळ सूचना करून भागणार नाहीं; सरकारच्या शैक्षणिक कार्यक्रमांतील उच्च शिक्षणाचें स्थान लक्षांत घेऊन नंतरच त्याबाबत सूचना करणें रास्त होईल. बेकारीच्या प्रश्नाचा श्री. चंदावरकर ह्यांनीं उल्लेख केला आणि सरकार व व्यापारी आणि कारखानदार ह्यांच्या सहायावांचून केवळ एकट्या विश्वविद्यालयास विशेष कामगिरी करतां येणार नाहीं, हें स्पष्ट केलें. अर्जदारांची लायकी लक्षांत घेऊनच नेमणुका करणें इष्ट आहे; त्याची जात अगर त्याचा वशिला ह्यांचा विचारहि होता कामा नये असें त्यांनीं सांगितलें. सरकारनें ह्याबाबत पुढाकार घ्यावा असेंहि त्यांनीं सुचविलें. उद्योगधंदे आणि विश्वविद्यालयीन शिक्षण ह्यांची सांगड घालण्याच्या आवश्यकतेसंबंधीं श्री. चंदावरकर ह्यांनीं प्रकट केलेले विचार सर्वांस संमत होतील ह्यांत संशय नाहीं.

---

## मोटारींच्या वहातुकीचा वाढता विस्तार

आधुनिक आर्थिक पद्धतीचा प्रसार देशांत झपाट्यानें होत असल्यामुळें हिंदी सामाजिक जीवनांत महत्त्वाचे फेरबदल झाले आहेत आणि प्रत्यहीं होत आहेत. ह्या " सुधारणे " चे कित्येक तात्कालिक परिणाम प्रतिकूल स्वरुपाचे असून तिचे योगानें आर्थिक जीवनाची घडी विसकटली आहे. सामाजिक रहाणीच्या एका भागांत फरक झाला असतां त्यामुळें दुसऱ्या भागांत उत्पन्न होणारीं वैगुण्यें नाहींशीं होण्यास अवधि लागतो आणि कदाचित तीं दूरहि होत नाहींत. ह्या परिस्थितींत समाजाची दुरवस्था होते आणि ती समाजांतील कित्येक वर्गांस भोवते. आगगाड्या आणि इतर वहातुकीचीं साधनें ह्यांचा हिंदुस्थानांत प्रसार झाल्यानें जनतेला सुखसोयी उपलब्ध झाल्या आहेत, ह्यांत शंका नाहीं. लांबचा प्रवास थोड्या वेळांत आणि अल्प आयासानें होत असून मालाची वहातुक सुलभ झाल्या कारणानें दुष्काळाची तीव्रता कमी झाली आहे. तथापि, आगगाड्यांच्या आणि मोटारींच्या वहातुकीनें बैलगाड्यांचा धंदा बसला आहे आणि शेतकऱ्यांच्या उत्पादनाचें एक महत्त्वाचें साधन नष्ट झालें आहे. शेतीच्या जनावरांच्या स्थितीवरहि ह्याचा प्रतिकूल परिणाम झाला आहे. मोटारीच्या धंद्यांत अधिक लोकांस काम मिळत आहे ही गोष्ट, जनतेस प्रवासाच्या आणि मालाच्या वहातुकीच्या ज्यास्त सोयी उपलब्ध झाल्या आहेत ह्या गोष्टींबरोबरच, आर्थिक घडामोडींच्या एका पारड्यांत घालणें आवश्यक आहे.

---

## अंगवळणीं पडलेला क्रान्तिकारक फेरबदल

कित्येक सामाजिक आणि आर्थिक फेरबदल क्रांतीच्या स्वरूपाचे असूनहि लोकांच्या अंगवळणीं पडल्यानें तीव्रतेनें भासत नाहींत; निदान, त्यांचें दीर्घपरिणामकारक पर्यवसान उत्कटतेनें ध्यानांत येत नाहीं. मोटारींच्या वहातुकीचा अलीकडे एवढा मोठा प्रसार झाला आहे कीं, तीमध्यें कांहीं व्यत्यय आल्यास आपल्या जीवनांत कांहीं तरी महत्त्वाची बाब कमी झाल्यासारखें लोकांस वाटतें. पश्चिम समुद्रालगतची कोकणची पट्टी आणि घाटावरील प्रदेश ह्यांच्यामधील दळण-वळणासंबंधानें हा परिणाम विशेष रीतीनें लक्षांत येतो. सर्व हिंदुस्थान देशभर मोटारींची वहातुक आतां इतकी पसरली आहे कीं तिची स्पर्धा रेल्वेजनाहि जाचक वाटूं लागली असून तिची तीव्रता कमी करण्याचे जारीचे यत्न चालविले आहेत, हें प्रसिद्धच आहे. मोटारींची वहातुक आतां सामान्य जनतेचीहि रोजची गरज भागवणारी गोष्ट होऊन बसली आहे आणि तिच्यावांचून लोकांचें जणूं काय चालेनासें झालें आहे. मोटारींच्या युगाचे पूर्वी आपला प्रवास आणि मालाची वहातुक कशी चालत असे ह्याचें नवीन पिढीस ज्ञानहि मिळण्याची पंचाईत असून जुन्या पिढीस त्याचें विस्मरण झाल्यासारखें दिसत आहे. देशाच्या कोठल्याहि भागांत मोटारींच्या नेहमीच्या वहातुकीस अडथळा झाला कीं लोकांची कशी तारांबळ उडते हें पहाण्यासारखें आहे. मुंबईच्या पॅसेंजर्स अँड ट्रॅफिक रिलीफ असोसिएशनच्या वार्षिक सभेचे प्रसंगीं मेयर, मि. सुलतान चिनॉय, ह्यांनीं आपल्या

भाषणांत हिंदुस्थानांतल्या वहातुकीचा प्रश्न रेल्वेजनीं सुटणार नसून तो मोटारींनीं सुटणार आहे असें सांगितलें. पूर्व आयुष्यांत आपणांस मुंबईच्या बाहेर माल्राच्या आगगाड्या आणि बैलाच्या गाड्या ह्यांत प्रवास करावा लागे आणि १९१९ सालीं प्रथमच आपण अहमदनगरकडील निम्म्या अंतरापर्यंत प्रथम मोटार गाड्यांच्या वहातुकीचा धंदा चालू केला ही माहिती देऊन सध्या पुणें विभागांतून सहा हजार मोटार बसेस ने-आण करीत असल्यानें हा केवढा प्रचंड फेरबदल झाला आहे ह्याचें त्यांनीं दिग्दर्शन केलें. अलीकडे कोल्हापूर ते रत्नागिरी वहातुक करणाऱ्या मोटारी बंद पडल्यानें कोंकणांतील लोकांची किती गैरसोय झाली ह्याचें चित्र रत्नागिरीच्या "सत्यशोधकां" त काढलें आहे तें उद्बोधक आहे. तें पत्र म्हणतें:—सदर संपांत सुमारें ३५० लॅारीज व ३०-३५ टूरिंग कार्स सामील झालेल्या आहेत. सदर संपामुळें रोज सुमारें ३,०००–३,५०० प्रवासी लोकांची कुचंबणा होत असून रोज सुमारें १५ हजार रुपये नुकसान होत आहे. शिवाय १,०००–१२०० लोक बेकार स्थितींत भटकत आहेत"

---

### व्यापारी कराराच्या वाटाघाटी

हिंद–ब्रिटन व्यापारी कराराच्या वाटाघाटींसाठी नेमलेल्या बिन-अधिकारी हिंदी सल्लागार मंडळाची बैठक गेल्या आठवड्यांत सिमला येथें भरली होती, त्यावेळीं हिंदुस्थान सरकारचे व्यापार-मंत्री, सर झाफरुल्लाखान, ह्यांनीं करारावाबतच्या ताज्या परिस्थितीचें वृत्त मंडळास निवेदन केलें. ग्रेटब्रिटनच्या कापडास हिंदुस्थानांत उतरण्यापूर्वी भरावी लागणारी जकात त्या देशानें खरेदी केलेल्या हिंदी कपाशीवर अवलंबून रहावी, अशी लँकेशायरच्या व्यापाऱ्यांची सूचना आहे. लँकेशायर दरसाल किमान किती हिन्दी कपास घेईल, हें मात्र निश्चित केलेलें नाहीं. हिन्दी सल्लागार मंडळानें वरील सूचनेचा विचार करण्यासाठी सुमारें तीन आठवडे मुदत मागून घेतली आहे. मंडळाची बैठक ता. ३ सप्टेंबर रोजीं पुनः भरेल, त्यावेळीं कांहींतरी निश्चयात्मक धोरणाचा खुलासा होऊन, कराराच्या वाटाघाटी पुऱ्या होतात, लांबणीवर पडतात कीं फिसकटतात, हें स्पष्ट होईल.

---

### कपाशीच्या उत्पादनांत वाढ

अमेरिकेंतील कपाशीचें चालू मोसमांतील उत्पादन अपेक्षेपेक्षा बरेच मोठें होणार असल्याचें अधिकृतरीत्या प्रसिद्ध झाल्याबरोबर जगांतील सर्व देशांमधील कपाशीच्या व्यापाऱ्यांस एक प्रकारचा धक्का बसला आणि सर्व बाजारांतील कपाशीचे भाव उतरले. अमेरिकेंतील कपाशीचें पीक चांगलें येणार परंतु गिरण्यांत उठाव मात्र कमी होणार, अशी परिस्थिति आतां निर्माण झाली आहे. गेल्या वर्षांतील कांहीं कपास शिल्लक आहे, ती वेगळीच. मंदीचें पटल दूर होऊन गिरण्यांतील खप वाढल्याविना कपाशीस तेजी येणार नाहीं. वाईट हवेमुळें कपाशीच्या पिकांत बिघाड झाला, तरच भावांत चढ होण्याचा संभव आहे. कपाशीच्या पिकाचा बाजार जगद्व्यापी असल्यामुळें, एका देशांतील परिस्थितीचा अनुकूल-प्रतिकूल परिणाम दुसऱ्या देशांवर होणें अपरिहार्य असतें. ह्या दृष्टीनें, हिंदी कपाशीचा भावहि आंतरराष्ट्रीय बाजारांतील चढ-उताराप्रमाणें हेलकावे खात राहील, हें उघड आहे.

---


**Very useful for Central and Urban Co-operative Banks and Societies.**

**" URBAN BANKS "**

BY

L. K. BHAGWAT,

*Chief Accountant,*

**Bombay Provincial Co-operative Bank, Ltd.**

The book written in English, besides fully, describing the structure and functions of all types of Urban Banks, supplies practical hints to actual workers on the proper conduct of their day to day business including maintenance of accounts and records, cheques, endorsements, bills, audit, annual closing &c. **Principal Tannan** remarks in his foreword: "The book will show the reader the way to keep the co-operative house in the order expected of it." Price Rs. 2. Postage extra. Copies can be had from L K. Bhagwat, Vincent Road, Plot No. 168 A, Dadar, Bombay 14



FOR
**SAFETY, ECONOMY**
AND
**DURABILITY**
Consult
**V. G. & Sons**
ELECTRICAL and RADIO ENGINEERS
AND
LICENSED ELECTRICAL CONTRACTORS
**Laxmi Road, Ganapati Chowk, POONA.**



**शेअरवर चांगलें डिव्हिडंड वाटणाऱ्या**
एका कारखान्याला ६ महिने ते ५ वर्षें मुदतीच्या
**ठेवी घेणें आहेत**
व्याज मुदतीप्रमाणें द. सा. द. शें. ४ ते ६ टक्के दिलें जातें. माहिती मागवितांना रक्कम किती व केव्हां गुंतविणें आहे तें लिहावें.
**आत्माराम रावजी भट, C/o केसरी कचेरी, पुणें २.**



पूर्वीची कर्जयोजना चालू असून शिवाय कर्जखातें नं. २ नें
**द. म. द. शें. ४चार आणे व्याजानें**
व
**अनुक्रमानें रु. १०० ते २०००**
देण्याची नवीन योजना. **लवकर अर्ज करा; लवकर कर्ज मिळवा.** त्वरा करा आणि प्रॉस्पेक्टस व एजन्सीसाठीं ४२ आण्याचीं तिकिटें पाठवा अगर समक्ष भेटा.
**दि हिंदुस्थान इंडस्ट्रियल कंपनी, लि.**
हेड ऑफिसः-गिरगांव, मुंबई. ब्रँचः-लक्ष्मी रोड, पुणें नं. २

## शास्त्रीय शिक्षणास व्यवहाराची जोड पाहिजे.

( ले.—डब्ल्यू. आर. पराडकर, लंडन डिप्लोमॅटिस्ट व प्रो. टेलर्स कटिंग ॲकॅडेमी )

शिवण कलेंतील बेकारी हल्लींच्या एकांगी तात्त्विक शिक्षणानें वाढत आहे, त्याचें कारण भरपूर प्रॅक्टीसचा, उमेदवारी पद्धतीचा, कारखान्यांच्या मदतीचा, व पाठ्य पुस्तकांचा अभाव हें होय. धंदेशिक्षण हे धंदा चालू असलेल्या ठिकाणीं घेणें जास्त फायदेशीर आहे.

कारखान्यांत अगर फर्ममध्यें वास्तविक शिवणकलेचें शिक्षण घेण्यास मेहनत जास्त लागते व खर्च फार लागत नाहीं. आर्टस कॉलेजेसप्रमाणें हींहि कला शिकविणारीं कॉलेजें आतां स्थापन झालीं आहेत, हें प्रगतीचें चिन्ह आहे. परंतु पुढें धंदा जो सुरू करावयाचा त्यास कॉलेजांतून मिळणारी माहिती व प्रॅक्टीस कमी पडत असून, परीक्षेपुरतांच अभ्यास झाल्यानें नुसत्या सर्टिफिकिटावर नोकरी मिळणें अगर धंदा चालविणें कठीण जातें, असा अनुभव आहे. जो धंदा शिकावयाचा असेल त्या धंद्याचे प्रत्यक्ष व्यवहार जेथें होतात त्या ठिकाणींच जर शिक्षणाची सोय असेल तर तेथें शिक्षण घेण्यानें ज्यास्त फायदा होतो व खर्चहि कमी येऊन धंदा कसा, कोठें व केव्हां सुरू करावा हें कळतें. कॉलेजांतील शिक्षणास अशा प्रकारच्या व्यावहारिक शिक्षणाची जोड असणें आवश्यक आहे.

कॉलेजांच्या चालकांनींच स्वतःचीं दुकानें ठेवून कांहीं महिन्यांच्या शिक्षणानंतर विद्यार्थ्यांस भरपूर प्रॅक्टीससाठी व गिऱ्हाइकांच्या निरनिराळ्या येणाऱ्या अनुभवासाठी त्यांमध्यें सोय करावी म्हणजे विद्यार्थ्यांस फीशिवाय जादा खर्च न येतां पूर्ण खात्री होईपर्यंत शिक्षण घेतां येईल.

आपल्याकडे लागणाऱ्या सर्व फॅशन्सचें शिक्षण देणाऱ्या संस्था पुण्यांत पुष्कळ आहेत व तेथें खर्च कमी येऊन नंतर जरूर तर नोकरीसुद्धा मिळते. अशा संस्थांना उत्तेजन देणें व गरीब लोकांची सोय करणें जनतेचें व सरकारचें कर्तव्य होय.

हल्लीं सरकारनें शिवणकलेंत लक्ष घालून जर कोणती शिक्षणाची सुधारणा करावयाची असेल तर ती ही होय कीं सध्या पास झालेले बेकार विद्यार्थी आहेत त्यांच्या पुढील प्रॅक्टीसच्या योजनेकरतां व यापुढें शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांकरितां ज्या दुकानदारांच्या स्वतःच्या शिक्षण संस्था आहेत तेथें त्यांना निदान एक वर्ष तरी उमेदवारी पद्धतीनें भरपूर शिक्षण घेण्यास लावावें म्हणजे ते बेकार न राहतां स्वतंत्र दुकान काढू शकतील अगर कोठेंहि नोकरी मिळवूं शकतील.

शिवणकलेंत तरबेज झालेल्या अशा लोकांची परीक्षा घेऊन धंद्याला योग्य असा शेरा देणारीं सर्टिफिकिटें ठेवावींत. आजपर्यंतचें कोणतेहि नामांकित शिंपी पाहिले तर असें आढळून येईल कीं त्यांनीं आपलें शिक्षण फर्ममध्यें राहूनच वाढविलें आहे व तेथें त्यांनीं दुकान चालविण्याची पूर्वतयारी केल्याची खात्री केल्यावरच मग धंदा सुरू केलेला आहे. कोणी २ वर्षांत तर कोणी ५ वर्षांत आपआपल्या लायकीप्रमाणें तयार होऊन स्वतंत्र धंदेवाईक बनला आहे. पूर्वी तात्त्विक शिक्षण कमी असें पण भरपूर प्रॅक्टीस असल्यामुळें कोठें अडत नसे. सध्या तात्त्विक शिक्षण फार व प्रत्यक्ष प्रॅक्टीस कमी त्यामुळें धंदा करण्यास लागल्यावर अडचणी फार येतात.

शिवणकलेंत एकचतुर्थांश तात्त्विक शिक्षण व तीनचतुर्थांश प्रॅक्टीस लागतें. कमीतकमी रोज ८ तास जर शिक्षणांत खर्च केले व ३०० कपडे कापून व शिवून निरनिराळ्या गिऱ्हाइकांचे घेतले तर एका वर्षांत स्वतंत्र दुकान काढण्याइतकी साधारण व्यवहारी माणसाची तयारी होते. तेव्हां कॉलेजचें शिक्षण चालू असतानाच जर बाकीचा वेळ प्रॅक्टीसमध्यें घालविला तर पुन्हां निराळे दिवस प्रॅक्टीससाठीं खर्चीं न पडतां अल्प मुदतींत स्वतंत्र होतां येतें. काम करीत करीत पैसेहि पण मिळतात, त्यामुळें शिक्षण वाढविण्यास खर्च न येतां स्वतःच लक्ष ठेवून जास्त जबाबदारीचीं कामें अंगावर घ्यावी लागतात त्यामुळें आपोआप शिक्षण होतें. शिवणकलेवर उपयुक्त अशीं विविध पुस्तकें प्रसिद्ध असून सुद्धा त्यांचा उपयोग शिवणकलेच्या संस्थांतून केला जात नाहीं, असें आढळतें. पुस्तकांच्या अभावीं विद्यार्थ्यांचा वेळहि पुष्कळ जातो. ह्या बाबतींतहि सुधारणेस पुष्कळ वाव आहे.

---

### प्रवासी आकर्षण्याची खटपट

काश्मीर संस्थानांत प्रवासी आकर्षण्याकरितां आवश्यक ती व्यवस्था करण्यासाठी तेथील सरकारनें एक कमिटी नेमली आहे. एक दशवार्षिक योजना तिनें आखावयाची आहे आणि रस्ते, हॉटेल्स, विश्रामगृहें, स्नानगृहें, खेळांची सोय, आरोग्याच्या दृष्टीनें इष्ट त्या इतर सुधारणा, औषधपाण्याची व्यवस्था, इत्यादींबाबत कमिटीनें कार्यक्रम तयार करावयाचा आहे. येत्या वर्षाचे अंदाजपत्रकांत कमिटीचे खर्चासाठी एक लक्ष रुपयांची तरतूद केलेली आहे.

---

### पेन्शनच्या कागदांबरोबर पेन्शनरचा फोटो पाठवा

सेवानिवृत्त सरकारी नोकरांची ओळख ऑडिट ऑफिसला तात्काळ पटून त्यांचें पेन्शन मिळण्यास अडचण पडूं नये, ह्याकरितां छायाचित्रांच्या उपयोगास मुंबई सरकारनें मान्यता दिली आहे. पेन्शनच्या कागदांबरोबर पेन्शनरानें आपला फोटो सरकारी तिजोरींत दाखल करावा, म्हणजे तो योग्य त्या ऑडिट ऑफिसराकडे धाडण्यांत येईल. फोटोचा आकार पासपोर्टसाठी लागणाऱ्या फोटोइतका असावा. ह्या फोटोचा खर्च ज्यानें त्यानें स्वतः करावयाचा आहे आणि ह्या नवीन योजनेचा फायदा घेणें न घेणें पेन्शनरांच्या इच्छेवर अवलंबून ठेवलें आहे.

---

### हिंदी कोळशावर पट्टी

हिंदी कोळशाच्या खाणींतील कोळशाचा नाश आणि काम गारांस होणारे अपघात टाळण्याकरितां उपाययोजना सुचविण्यासाठी हिंदुस्थान सरकारनें एक कमिटी नेमली होती, तिच्या शिफारसींस अनुसरून सरकारनें एका बिलाचा मसुदा तयार केला आहे. झारिया आणि राणीगंज येथील खाणींतील कोळशाचे छतास वाळूच्या पोत्यांच्या खांबांचा आधार देण्यांत यावा आणि ह्या खर्चाची तरतूद करण्यासाठी कोळशाचे उत्पादनावर दर टनास चार आणे पट्टी बसवावी, अशी सरकारची योजना आहे. ह्या पट्टीमुळें विदेशी कोळशाचा खप व त्याची आयात हीं वाढली, तर सरकार त्याबाबत योग्य ते उपाय योजील, असें धोरण आखण्यांत आलें आहे.

## सहकारी चळवळ

### पुणतांबे को. क्रे. सोसायटी, ता. कोपरगांव
#### वार्षिक सर्वसाधारण सभा

या सोसायटीची वार्षिक सर्वसाधारण सभा पुणतांबे येथें रविवार ता. १४।८।३८ रोजीं रात्रीं ९ वाजतां सोसायटीचे इमारतींत भरली होती. या सभेकरितां श्री. के. बी. देशमुख, एम. एल. ए. व प्रेसिडेंट नगर डिस्ट्रिक्ट लोकलबोर्ड, रावबहादुर एन. ई. नवले, एम. एल. ए., श्री. पी. के. भापकर, चेअरमन नगर डिस्ट्रिक्ट इन्स्टिट्यूट, श्री. सी. एन. सहस्रबुद्धे, सिनियर इन्स्पेक्टर मुंबई प्रॉ. को. बँक नगर, त्याचप्रमाणें जिल्हा बोर्डाचे बरेच सभासद वगैरे मंडळी नगरहून आलेली होती. तसेच यूनिअन सुपरवायझर, बँक इन्स्पेक्टर व स्थानिक बरेच लोक सभेस हजर होते. सभेचे नियोजित अध्यक्ष आमदार के. बी. देशमुख यांना यावयास थोडा उशीर झाल्यामुळें सभेचें काम नगर इन्स्टिट्यूटचे चेअरमन श्री. पी. के. भापकर यांचे अध्यक्षतेखालीं ९ वाजतां सुरू झालें.

सभेंत पास झालेल्या ठरावांत दोन ठराव अत्यंत महत्वाचे आहेत. सभासदांनीं आपलीं कर्जें वक्तशीर मुदतींत परत केल्यास त्यांना ॥ पै प्रमाणें कायम रिबेट देण्याबाबत पोटनियम दुरुस्तीचा ठराव करण्यांत आला आहे. मुंबई प्रॉ. को. इन्स्टिट्यूटमध्यें नवीन घटना होण्याचें घाटत असून ह्या योगें सोसायटीचे हक्क नष्ट होण्याचा संभव आहे. तरी इन्स्टिट्यूटची पूर्वीची घटना कायम राहून इन्स्टिट्यूटबाबत सोसायट्यांना दिलेले हक्क कोणत्याहि प्रकारें कमी करण्यांत येऊं नयेत, असा दुसऱ्या ठरावाचा आशय आहे.

सभेचे नियोजित अध्यक्ष आमदार के. बी. देशमुख, श्री. भापकर, सिनिअर इन्स्पेक्टर श्री. सहस्रबुद्धे, राव. नवले यांचीं अत्यंत कळकळीचीं सोसायट्यांचें महत्व पटवून दुणारीं परिणामकारक भाषणें झालीं. सभेस ३०० लोक हजर होते. सोसायटीचे चेअरमन श्री. काशिनाथ नारायण पाटील यांनीं जमलेल्या मंडळींचे आभार मानल्यावर पानसुपारी व अल्पोपाहार होऊन सभा बरखास्त झाली.

---

### हवेली तालुका ॲग्रिकल्चरल डेव्हलपमेंट असोसिएशन, पुणें

या संस्थेची वार्षिक सर्वसाधारण सभा रविवार, तारीख २८ ऑगस्ट, १९३८ रोजीं दुपारीं २ वाजतां हवेली मामलेदार कचेरींत श्री. भालचंद्र महेश्वर गुप्ते, एम. ए., एलएल. बी., एम. एल ए., (पार्लमेंटरी सेक्रेटरी, लोकल सेल्फ गव्हर्मेंट) यांचे अध्यक्षतेखालीं भरणार आहे.

---

### पुणें जिल्हा को. लँड मॉर्गेज बँक लि.
#### ( वार्षिक सभा: १८-९-३८ )

बँकेच्या स्थापनेपासून ३०-६-३८ अखेर तिच्याकडे कर्जाकरितां ५११ अर्ज आले, त्यांपैकीं १४६ अर्ज बँकेनें स्वीकारून सुमारें १½ लक्ष रुपये कर्ज दिलें आहे. ह्यापैकीं १¼ लक्ष रुपये म्हणजे शेकडा ८५ टक्के रकम जुन्या कर्जांचे फेडीसाठीं दिलेली आहे. १ लक्ष, ८० हजार रुपये कर्जाची तडजोड १ लक्ष, ४९ हजार रुपयांत करून बँकेनें कर्जदारांस ३१ हजारांची सूट मिळवून दिली आहे. अहवालाचे वर्षी बँकेस १,५५३ रुपये नफा झाला, त्यांतून मागील तोट्याची व बाजूस काढून ठेवलेली रकम वजा जातां निव्वळ नफा ४ रु. १० आ. १ पै उरतो. ही रकम रिझर्व्ह फंडांत सामील करावी, अशी बोर्डाची शिफारस आहे. म्हणजे, साल अखेर रिझर्व्ह फंडाची रकम ८९१ रुपये होईल. कर्जदारांकडून एकूण येणें बाकी १ लक्ष, ६३ हजार रुपये असून बँकेनें प्रांतिक लँड मॉर्गेज बँकेस १ लक्ष, ६८ हजार रुपये द्यावयाचे आहेत. १९३८-३९ सालाकरितां वार्षिक सभेंत डायरेक्टर्स निवडण्यांत यावयाचे आहेत.

---

### पुणतांबे अॅ. को. क्रे. सो अनलिमिटेड

" नगर जिल्ह्यांतील कोपरगांव तालुक्यामध्यें स्वतःच्या मालकीचें ऑफिस असलेली, पूर्णपणें आपल्या भांडवलावर चाललेली व भरभक्कम पायावर उभी असलेली अशी ही एकच सोसायटी आहे. " सोसायटी गेलीं तीन वर्षें " अ " वर्गांत आहे. सभासदांची संख्या ८६ असून त्यांपैकीं ७४ कर्जदार सभासदांकडे १३,३०० रुपये येणे आहेत. त्यांपैकीं, ३,९०० रुपये थकलेले आहेत. सभासदांच्या ठेवींची आणि भाग भांडवलाची रकम अनुक्रमें १,०१० रुपये आणि १,९५० रुपये अशी आहे. सोसायटीच्या ताब्यांत सहा सभासदांची ४१ एकर जमीन आहे, त्यांत गंतलेल्या भांडवलावर ३ टक्के व्याज सुटत आहे. सोसायटीनें नांगर ठेवले असून ते भाड्यानें दिले जातात. त्याच्या जोडीला धान्यविक्रीचाहि उपक्रम सोसायटीनें सुरू केला आहे. पुढील वर्षी वैरणीचा स्टोअरहि उघडण्याचा तिचा विचार आहे. सोसायटीचें भांडवल स्थानिक असून, एकूण खेळत्या भांडवलापैकीं निम्म्याहून अधिक भांडवल ( १७½ हजारांपैकीं १०½ हजार ) रिझर्व्ह फंडांतील आहे, हें विशेष होय. सालअखेर सोसायटीस ५६५ रुपये नफा झाला आहे. श्री. काशिनाथ नारायण पाटील हे सोसायटीचे चेअरमन आहेत.

---

### चतुःशृंगी को. क्रे. सोसायटी लि., पुणें
#### (वार्षिक सभा: २५-८-३८)

अहवालाचे वर्षअखेर सोसायटीच्या सभासदांची संख्या २२० असून एकूण ३४५ भाग खपलेले आहेत. सोसायटीचे इतके सभासद असूनहि अद्यापि त्यांपैकीं फारच थोडे सभासद सोसायटीच्या प्रत्यक्ष व्यवहारांत लक्ष घालतात, ही व्यवस्थापक मंडळाची तक्रार अजून कायम आहे, ही नाउमेदीची गोष्ट आहे. सभासदांच्या ठेवींत थोडीफार वाढ झाली ह्याचें मुख्य कारण कर्ज देते वेळीं हप्त्यांच्या संख्येच्या निम्मे रुपये असि. रजिस्ट्रारच्या सूचनेस अनुसरून ठेव म्हणून सक्तीनें घेण्यांत येतात, हेंच होय. साल अखेर सोसायटीस निव्वळ नफा ६११ रुपये झाला, त्यांतून ३६७ रुपयांचा विनियोग डिव्हिडंड देण्यासाठीं करावा, अशी व्यवस्थापक मंडळाची सूचना आहे. सोसायटीचा रिझर्व्ह फंड ४ हजार रुपयांहून अधिक आहे. १९३७-३८ अखेर एकहि कर्ज थकलेलें नाहीं. सोसायटीचा कारभार तिच्या व्यवस्थापक मंडळाच्या देखरेखीखालीं कार्यक्षम रीतीनें चालू आहे. "सहकारी चळवळ स्वावलंबन व परस्परांस सहाय करण्याची बुद्धि शिकविते, व या भावनेनें प्रेरित होऊन जर लोक सोसायटीचे सभासद होतील व सोसायटीच्या कारभारांत जास्त लक्ष घालतील, तरच सहकारी सोसायटीची खरी वाढ होत आहे असें म्हणणें रास्त होईल " हा अहवालांतील शेरा सोसायटीच्या सभासदांनीं ध्यानांत बाळगणें आवश्यक आहे.

पुण्यांत येणाऱ्या प्रवाशांसाठीं भोजनाचें व उतरण्याचें निर्धास्त ठिकाण.
पूना
गेस्ट हाऊस
टेलिफोन नं. ७७९ : लक्ष्मी रोड—गणपति चौक—पुणें.
हवेशीर जागा
सुग्रास भोजन
उत्तम आदरातिथ्य

## मराठा चेंबर ऑफ कॉमर्स अँण्ड इंडस्ट्रीज, पुणें

### वार्षिक सभा

वरील संस्थेचा चतुर्थ वार्षिक अहवाल तिच्या वार्षिक सभेंत शनिवार ता. २० आगस्ट रोजीं मंजूर करण्यांत आला. अहवालाच्या सालअखेरीस चेंबरच्या पटावर १०० समासद आहेत. पहिल्या वर्षी ५३, दुसऱ्या वर्षी ७९, तिसऱ्या वर्षी ९८ व चवथ्या वर्षी १०० अशी सभासदांच्या संख्येची वाढती कमान आहे. अहवालाच्या सालांत कार्यकारी मंडळाच्या एकूण सहा सभा झाल्या आणि त्यांमध्यें निरनिराळ्या प्रश्नांवर चर्चा झाली. पांच व दहा रुपयांच्या नोटांवरील नंबर, इंडियन मर्चंट्स चेंबरच्या पुण्यांतील व्यापारी परीक्षांची व्यवस्था, मुंबई सरकारचें आर्थिक धोरण व उद्योगधंदे-संवर्धनाची योजना, टेलिफोन सुधारणा, सावकार नियंत्रण व शेतकरी-ऋण-विमोचन बिलें, हिंदी विमा बिलाच्या सिलेक्ट कमिटीचा अहवाल, पुणें म्युनिसिपॉलिटीनें लाडूं केलेली सुतावरील जकात, मुंबई सरकारची दोन तऱ्हेच्या औद्योगिक शिक्षणाच्या शाळा काढण्याची योजना, स्टँप ड्यूटीज युनिफिकेशन बिल, साखरेच्या उत्पादनासंबंधीं श्री. मुळजी ह्यांच्या टीकेला उत्तर, श्री. जोशी ह्यांची रट-रेल्वे योजना, पुरंदर तालुका पहाणी, इत्यादि बाबत चेंबरनें केलेल्या उपयुक्त कामगिरीची माहिती अहवालांत दिलेली आहे.

अहवाल आणि हिशेब मंजूर झाल्यानंतर पुढील वर्षाच्या कार्यकारी मंडळाची निवड झाली. त्यानंतर, चेंबरचे अध्यक्ष, प्रो. वा. गो. काळे, हे आपल्या भाषणांत म्हणाले:—

### प्रो. काळे ह्यांचें भाषण

"मुंबई प्रांताच्या प्रधानमंडळानें प्रांतांतील लहान-मोठ्या उद्योगधंद्यांच्या वाढीसाठी चालविलेल्या प्रयत्नांबद्दल त्यांचें अभिनंदन करणें आवश्यक आहे. (१) प्रांताची औद्योगिक पहाणी करण्यासाठी आणि (२) उद्योगधंद्यांच्या वाढीसंबंधीं सल्ला देण्यासाठी सरकारनें दोन कमिट्या नेमून ह्या प्रश्नाकडे अगत्यपूर्वक लक्ष पुरविलें आहे. प्रधान मंडळाचा चेंबरनें सन्मान केला त्यावेळीं मुख्य प्रधानांनीं महाराष्ट्रांतील उद्योगधंद्यांच्या प्रगतीस सरकार सहानुभूतिपूर्वक सहाय करील, असें आश्वासन दिलें, ही गोष्ट अत्यंत उत्साहवर्धक आहे आणि त्याबद्दल चेंबर त्यांची आभारी आहे. महाराष्ट्रांत उद्योगधंद्यांच्या वाढीस आतां जोरानें चालना मिळाली आहे. तथापि, परस्पर-संघटन जास्त जोमदार होण्याची आणि जनतेकडूनहि अधिक पाठिंबा मिळण्याची आज विशेष आवश्यकता आहे. महाराष्ट्रांतील साखरेच्या कारखान्यांविरुद्ध श्री. मुळजी सारख्यांनीं चालविलेल्या तक्रारींत वस्तुस्थितीचा विपर्यास केलेला आहे. गुळाचा भाव अलीकडे सुधारल्यामुळें खेडेगांवांतील जनतेवरील खर्चाचा बोजा वाढत आहे, ह्या त्यांच्या मुद्यांतील फोलपणा स्पष्ट आहे. शेतीच्या मालाचे बाजारभाव वाढावे अशी सर्वांची तीव्र इच्छा आहे. परंतु त्यापासून शेतकऱ्यांचें नुकसान होत असल्याचें श्री. मुळजी सांगतात ! अशा अज्ञानमूलक आणि भ्रामक टीकेचें सत्यस्वरूप ओळखून वस्तुस्थितीचें आकलन करण्यास महाराष्ट्रीय जनतेनें शिकलें पाहिजे. सरकारास शेतकऱ्यांच्या हिताची पूर्ण जाणीव आहे आणि महाराष्ट्रांतील साखर कारखान्यांच्या स्थापनेचा श्री. मुळजींनीं दृष्टिआड केलेला पूर्वेतिहासहि त्यास माहीत आहे."

---

## मुंबई प्रांतांतील इनामदारांची परिषद्

मुंबई प्रांतिक जमीनदार संघातर्फे खंडकऱ्यांच्या बिलाबाबत मत व्यक्त करण्याकरितां मुंबई प्रांतांतील इनामदारांची परिषद् शनिवार ता. २० रोजीं श्री. सरदार माधवराव किबे ह्यांचे अध्यक्षतेखाली भरली होती. अध्यक्षांनीं आपल्या प्रास्ताविक भाषणांत तडजोडीच्या प्रयत्नांचे महत्त्वावर भर दिला आणि नियोजित कायद्याचे बिलांत सुधारणा सुचविल्या. परिषदेनें खालील ठराव मंजूर केले:—(१) प्रस्तुत बिल जमीनदारांच्या मालकी हक्कावर गदा आणणारें आहे, (२) जमीनदार व कुळें ह्यांच्या हितसंबंधांविषयीं माहिती गोळा न करतां बिल मांडण्यांत सरकारची विनाकारण घाई होत आहे, (३) इनामदार वर्गाविषयीं पूर्वग्रहदूषित मत धारण करून बिलाची योजना झाली असल्याची इनामदार वर्गास शंका येत आहे, (४) जमीन मालकांच्या पाठिंब्यानें निवडून गेलेल्या विधिमंडळांतील सभासदांनीं बिलास विरोध करावा, (५) बिल मांडण्यास गव्हर्नरनें परवानगी देऊं नये, (६) खोतांच्या पूर्वापार हक्कांबाबतच्या आश्वासनांचा नवीन कायद्यानें भंग होणार आहे, इत्यादि.

---

## मुंबई प्रांतिक जमीन मालक परिषद्

मुंबई प्रांतिक जमीन मालक परिषदेचें अधिवेशन पुणें येथें श्री. दत्तात्रय व्यंकटेश बेळवी ह्यांचे अध्यक्षतेखाली रविवार, ता. २१ रोजीं भरलें होतें. "रयतवारी पद्धतीमध्यें जमीन जमीनदारांची आहे, सरकारची मालकी तिच्यावर नाहीं, हें तत्त्व प्रस्थापित करण्याचा लोकप्रतिनिधींचा आजवर प्रयत्न होता. परंतु, खासगी मालमत्तेचें तत्त्व झुगारून देण्याच्या प्रयत्नाची, खंडकऱ्यांचा कायदा ही काँग्रेस सरकारची पहिली पायरी आहे, हें आपण ओळखलें पाहिजे. इनामदारांनीं ब्रिटिश सरकारशी एकनिष्ठ राहण्याचे करार केले आहेत, त्यामुळें काँग्रेसला ते सहाय करूं शकत नाहींत; तेव्हां त्यांच्यावर देशद्रोहाचा आरोप करणें बरोबर नाहीं. खंडकऱ्यांच्या कायद्यानें वर्गकलह माजण्याचा संभव आहे." अशी प्रस्तावना अध्यक्षांनीं केल्यानंतर निरनिराळ्या ठरावांवर चर्चा झाली. परिषदेनें खालील ठराव मंजूर केले:—(१) टेनन्सी बिल ह्या परिषदेस पूर्णपणें अमान्य आहे; कारण त्या बिलाचे योगानें मालकी हक्कावर गदा येते, कूळ निवडण्याचा आणि खंड ठरविण्याचा जमीनदाराचा हक्क मर्यादित होतो, कुळाला कायम कुळाचा विनामोबदला हक्क प्राप्त होतो, जमिनीची किंमत उतरते आणि वर्गकलह निर्माण होण्याजोगी परिस्थिति तयार होते. (२) योग्य चौकशी न करतां सरकारनें हें बिल आणलें, हें परिषदेच्या दृष्टीनें गैर झालें, (३) विधिमंडळांतील सभासदांनीं बिलास कसून विरोध करावा आणि जरूर तर राजीनामे द्यावेत, (४) गव्हर्नरनें आपला अधिकार उपयोगांत आणून बिलास परवानगी देऊं नये, इत्यादि.

---

## ग्रेटब्रिटनमध्यें अमेरिकन चित्रपटांचें उत्पादन

अमेरिकन कंपन्या आतां आपल्या चित्रपटांवर ज्यास्त पैसे खर्च करून, ते जगभर लोकप्रिय होतील, अशी व्यवस्था करतात. ग्रेटब्रिटनमध्यें तयार होणाऱ्या प्रत्येक बोलपटावर कांहीं विवक्षित प्रमाणांत खर्च झालेला असलाच पाहिजे; त्याखेरीज तो ब्रिटिश संरक्षणास पात्र होत नाहीं. ह्यामुळें अमेरिकन कंपन्यांस त्यांच्या ग्रेटब्रिटनमधील उत्पादनावर मोठ्या प्रमाणावर पैसे खर्च करावे लागतात. अर्थात् ह्या चित्रपटांस ग्रेटब्रिटनबाहेरहि चांगले पैसे मिळाल्यानें त्यांवर सढळ हातानें खर्च करणें अमेरिकन कंपन्यांस परवडतें.

## ग्रामीवरील कराबाबत कायद्याची दुरुस्ती

### डेक्कन सभेचा अभिप्राय

सन १९२२ च्या इंडियन इनकम टॅक्स ॲक्टांत, दुरुस्ती करणारें एक बिल हिंदुस्थान सरकारनें असेंब्लींत मांडलें आहे, त्यांतील कांहीं प्रमुख योजनांविषयीं डेक्कन सभेनें आपलें म्हणणें खालीलप्रमाणें सरकारास सादर केलें आहे.

( १ ) कराची आकारणी करण्याची टप्प्यांची—स्लॅब—पद्धति सभेस मान्य आहे. जसजसें उत्पन्न वाढत जाईल, त्याप्रमाणें प्रत्येक टप्प्यांतील उत्पन्नावर अधिकाधिक कर घेतला जाईल. ह्यामुळें कराचा बोजा योग्य प्रमाणांत बसून सरकारासहि उत्पन्न अधिक होईल.

( २ ) विम्याचे हप्त्यांकरितां दिलेल्या रकमेपैकी ६ हजार रुपयांवर करमाफी असावी, अशी बिलांत दुरुस्ती केली आहे. माफीची ही कमाल मर्यादा अपुरी असल्यानें ती १० हजारांपर्यंत वाढवावी.

( ३ ) पत्नीचें उत्पन्न स्वतंत्र असून त्याचा पतीच्या उत्पन्नाशीं कांहीं संबंध नसेल, तर तिचें उत्पन्न पतीच्या उत्पन्नांत मिळवून त्यावर कर बसविणें योग्य नाहीं. स्वतंत्रपणें पैसे मिळविणाऱ्या स्त्रियांवर त्यामुळें अन्याय होत आहे. हिंदु कायद्यांतील शोधनाच्या योजनेवरहि त्यानें आघात होत आहे.

(४) करास पात्र असणाऱ्या प्रत्येक नागरिकानें आपण होऊन आपल्या उत्पन्नाचा तक्ता सरकारास सादर केला पाहिजे, ही बिलांतील सक्तीची दुरुस्ती अनावश्यक आहे. सध्याच्या पद्धतींत फरक करण्यास सबळ कारण दाखविल्याविना केवळ ग्रेट ब्रिटनचा दाखला घेऊन उपयोग नाहीं.

( ५ ) प्राप्तीवरील करास पात्र असणाऱ्या कोणत्याहि नागरिकाचे घरांत प्रवेश करून त्याचे हिशेब तपासण्याचा अधिकार बिलानें इनकमटॅक्स अधिकारी आणि इन्स्पेक्टर्स ह्यांस दिला आहे, तो भयंकर व्यापक असून त्याची मुळींच आवश्यकता नाहीं.


(६) कराची आकारणी दोनदां होऊं नये म्हणून हिंदुस्थानांत व्यवहार करणाऱ्या ब्रिटिश कंपन्यांस सध्याच्या पद्धतीप्रमाणें कराचा रिफंड मिळतो, त्याची रकम सुमारें १¾ कोटि रुपये भरते. जपान आणि झांजिबार येथें धंदा करणारे हिंदी व्यापारी आपल्या उत्पन्नावर दोन ठिकाणीं कर भरतात, तेव्हां ब्रिटिश व्यापाऱ्यांस ही विशेष सवलत देण्याचें प्रयोजन नाहीं. सध्याची योजना रद्द केल्यास विदेशी भांडवल हिंदुस्थानांत येण्यास अडचण पडेल, ह्या मुद्यांत तथ्य नाहीं.

( ७ ) कराच्या आकारणीची कोणासहि माफी देण्याचा अधिकार बिलानें गव्हर्नर जनरल-इन-कौन्सिलला दिला आहे, हें अत्यंत गैर आहे. ज्या उत्पन्नांस माफी द्यावयाची असेल, त्यांचा समावेश कायद्यांतच करणें आवश्यक आहे; कारण गव्हर्नर-जनरल-इन-कौन्सिलला दिलेल्या अधिकाराचा उपयोग करतेवेळीं वेगवेगळ्या उत्पन्नांत भेदाभेद होणार नाहीं, ह्याची शाश्वती काय ? हिंदुस्थानाबाहेर दिलीं जावयाचीं पेन्शनें, हिंदुस्थान सरकारच्या स्टर्लिंग रोख्यांवरील व्याज, रजेच्या मुदतींतील पगार आणि भत्ते, इत्यादींस कराची माफी देण्यानें हिंदी तिजोरीचें असमर्थनीय नुकसान होत आहे, तें थांबविलें पाहिजे.

'अर्थ' ग्रन्थमाला
१ बँक आणि त्यांचे व्यवहार
२ हिंदुस्थानची रिझर्व्ह बँक
३ व्यापारी उलाढाली

दि गुड-वुइल
ॲशुअरन्स कंपनी लि.
पोस्ट : मिरज मिशन हॉस्पिटल
विमेदारांस
भरपूर सवलती माफक हप्ते
ठिकठिकाणीं एजंटस नेमणें आहेत.
पत्रव्यवहार करावा.
हेड ऑफिस : कुपवाड, जि. सातारा,
मॅनेजिंग डायरेक्टर

'अभिनंदनीय प्रगति' असेच बोल नाशिकच्या सह्याद्रि विमा कंपनीबद्दल सर्वांच्या तोंडून निघत आहेत. किमान हप्ते, चोख व्यवस्था, वजनदार संचालक, कर्तबगार प्रतिनिधी व आकर्षक योजना वगैरे अनेक सर्वोत्तम गोष्टी याच संस्थेंत आहेत. पॉलिसी किंवा एजन्सी घेण्यापूर्वीं आमचा सल्ला घेण्यास चुकूं नका. ठिकठिकाणीं पगार व कमिशनवर प्रतिनीधि पाहिजेत.
लिहा अगर भेटा. | मॅनेजिंग डायरेक्टर




स्त्रियांचा आजार
म्हणजे मुख्यतः विटाळदोष व गर्भाशयांत बिघाड होणें होय. आमचें औषध आर्डोमिक्स ( आर्तवदोषारि ) एका निष्णात स्त्रीरोग-चिकित्सकाचे यादीवरून तयार केलेलें असून आज सतत ६० वर्षांच्या अनुभवानें स्त्रियांच्या सर्व प्रकारच्या गुप्त रोगांवर अप्रतिम गुणदायक ठरलेलें आहे. धुपणी, विटाळ नसणें, थोडा अथवा कष्टदायक होणें, ओटी पोटांत कळा मारणें, ज्वर, कडकी, अकालीं गर्भपात, डोकें दुखणें, शौच्यास साफ न होणें, इत्यादि, विटाळदोष नाहींसे करून गर्भाशय निरोगी करण्याचा हमखास गुण या आर्डोमिक्समध्यें असल्यामुळें वैद्य व डॉक्टर्स मोठ्या प्रमाणावर वापरीत आहेत.
किंमत बाटलीस ३ रुपये, टपालखर्च १२ आणे. एकदम ३ बाटल्या मागविणारांस टपालखर्चासह फक्त ९ रुपये.
धी इंडो फॉरिन एजन्सीज. ( डि. नं. ६ )
२५।३।३ माधवविलास, टिळकवाडी, पुणें २.

## निवडक बाजारभाव

| | |
|---|---|
| बँक रेट ( २८ नोव्हेंबर, १९३५ पासून ) | ३% |

### सरकारी कर्जरोखे

| | |
|---|---|
| ५% करमाफ लोन ( १९४५-५५ ) ... ... | ११८—० |
| ५% ( १९३९-४४ ) लोन ... ... ... | १०३—४ |
| ४% १९४३ ... ... ... ... | १०८-१० |
| ३½% विनमुदत ... ... ... ... | ९९—० |
| ३½% १९४७-५० ... ... ... | १०६—६ |
| २¾% १९४८-५२ ... ... ... | १००—८ |

### निमसरकारी रोखे

| | |
|---|---|
| ४% पोर्ट ट्रस्ट ( बिगर गॅरंटी व लांब मुदत ) ... | १११—० |
| ४% मुंबई म्युनिसिपल ( लांब मुदत ) ... ... | १०९-१२ |
| ४% मुंबई सिटी इंप्रूव्हमेंट ट्रस्ट बाँड ( ७० वर्षे मुदत ) | १०९-१२ |
| ४% म्हैसूर कर्ज ( १९५३-६३) ... .. | ११२—४ |
| ५% म्हैसूर कर्ज ( १९५५ ) ... ... | १२४—४ |

### मंडळ्यांचे भाग

( कंसांतील पहिला आकडा भागाची दर्शनी किंमत, दुसरा आकडा वसूल झालेलें भांडवल व कंसानंतरचा आकडा वार्षिक डिव्हिडंड दर्शवितो.)

#### बँका

| | |
|---|---|
| बँक ऑफ इंडिया (१००—५०) ११% ... ... | १४३—० |
| बँक ऑफ बरोडा (१००—५०) १०% ... ... | ११२—० |
| सेंट्रल बँक ऑफ इंडिया ( ५०—२५ ) ८% ... | ३१—८ |
| इंपीरिअल बँक ( ५०० ) १२% ... ... | १५५८-१२ |
| बाँबे प्रॉ. को. बँक ( ५० ) ६% ... ... | ६०—० |
| रिझर्व्ह बँक ( १०० ) ३½% ... ... | ११७—८ |

#### रेल्वेज

| | |
|---|---|
| दौंड-बारामती ( १०० ) ४½% ... ... | १०२—० |
| पाचोरा-जामनेर ( १०० ) ४½% ... ... | ९६—४ |
| अहमदाबाद प्रांतज (५००) १२½% | ९६७—८ |
| तापी व्हॅली ( ५०० ) ७½% ... ... ... | ७५०—० |

#### वीज

| | |
|---|---|
| बाँबे ट्रॅम्वे ऑर्डि. ( ५० ) १३% ... ... | ११९—० |
| कराची ( १०० ) ९% ... ... ... | १९०—० |
| पुणें इलेक्ट्रिक ( १०० ) ९% ... ... | १७२—८ |
| टाटा पॉवर ऑर्डि. ( १००० ) ५½% ... — ... | १३९७—८ |
| आंध्र व्हॅली ऑर्डि. ( १००० ) ७½% ... ... | १४७०—० |

#### इतर

| | |
|---|---|
| बेलापूर शुगर ( ५० ) ७ रु. ... ... ... | १७६—० |
| इन्व्हेस्टमेंट ट्रस्ट ( १००-५० ) २ रु. ... ... | ४२—४ |
| शिंदिया स्टीम ( १५ ) १ रु. ... ... ... | . १९-१४ |
| न्यू इंडिया विमा ( ७५-१५ ) १ रु. ... | ३९—८ |
| ओरिएंटल विमा ( २०० ) १२५ रु. ... | ४५६०—० |
| टाटा आयर्न प. प्रे. ( १५० ) ६% ... ... | २०७—८ |
| टाटा आयर्न दु. प्रे. ( २०० ) १५ रु. २ आ. ... | १६१-१२ |
| टाटा आयर्न ऑर्डि. ( ७५ ) १० रु. ... ... | २७३—८ |
| टाटा आयर्न डिफर्ड ( ३० ) ३६ रु. ३ आ. ६ पै ... | १३१०—० |

#### सोनें-चांदी

| | |
|---|---|
| सोनें ( मिंट ) प्रत्येक तोळ्यास ... ... | ३५-१५-० |
| चांदी ( मिंट ) प्रत्येक १०० तोळ्यास ... ... | ५१-२-० |


**६ टक्के मासिक आंवक ठेव**

हॉन ऑफ इंडियाच्या वरील योजनेप्रमाणें तारीख १-१०-३८चे आंत ठेव ठेवून फायदा मिळवा.

जनरल म्यानेजर-हॉन ऑफ इंडिया ला. इ. कं. लि. पुणें.

**स्वतःचें मुलांना योग्य तऱ्हेनें शिक्षण देऊन**

त्यांचे आयुष्यांतील पुढील मार्गाची योग्य रीतीनें कालक्रमणा करण्याची तरतूद करून ठेवणें हें प्रत्येक विचारवंत मातापितरांचें आद्य कर्तव्य होय. वरील प्रकारची सोय, उत्तम रीतीनें, फक्त "आयुर्विम्या"चे योगेंच साधतां येते.

# कॉमनवेल्थ विमा कंपनी

## लिमिटेड, पुणें.

**ह्या सर्वश्रेष्ठ विमा संस्थेनें मुलांच्या शिक्षणाचे सोयीकरतां नवीन तऱ्हेचीं विद्यार्जनाचीं कोष्टकें सुरू केलीं आहेत**

ह्या बाबतींतील विशेष माहितीकरतां खालील पत्त्यावर लिहा.

रा. न. अभ्यंकर
बी. ए. एलएल. बी.
मॅनेजिंग एजंट.

# दि प्रॉव्हिन्शिअल बँक

## ऑफ अिण्डिया लिमिटेड

स्थापना १९३६

मुख्य कार्यालय : २२ / अ, हॉस्पिटल रोड, (सी. ॲण्ड. अेम् स्टेशन ) बंगलूर

शाखा : मुम्बअी, काळबादेवी, दादर, पुणें, पुणें-शहर, नाशिक, पांचगणी, सातारा, कऱ्हाड, सोलापूर, सुरत.

अध्यक्ष : **खानसाहेब हाजी अहमद कासम**, अेम. अेल. सी.
मॅ. डिरेक्टर : **अस्. पी. ठाकर.**

**करण्ट डिपॉझिट अकाउण्टस् :** १०० रु. किंवा त्याहून अधिक रकमांनीं चालू होतात आणि दैनिक शिलकेवर दरसाल दरशेंकडा २ टक्के व्याज दिलें जातें.

**सेव्हिंग्ज डिपॉझिट अकाउण्टस् :** ५ रुपये आणि त्याहून अधिक रकमानिशीं चालू होतात आणि मासिक किमान शिलकेवर दरसाल दरशेंकडा ३ टक्के व्याज दिलें जातें. २०० रुपयापर्यंत कितीहि वेळा पैसे काढतां येतात. हा व्यवहार चेकनें करतां येतो.

**कायम मुदतीच्या ठेवी :** दीर्घकालीन आणि अल्पकालीन मुदतीच्या ठेवी सोयीस्कर अटीवर स्वीकारण्यांत येतात. ह्यासंबंधीची माहिती कार्यालयाकडून घ्यावी.

अनुमती मिळालेल्या कर्जरोख्यावर हातउसन्या रकमा मिळतात.

सर्व प्रकारचें बँकिंगचें कामकाज केलें जातें.

अधिक माहिती मागवावी.

**एम्. मोहन, एजंट,** १७ मेनस्ट्रीट पुणें.
**एच. जी. गद्रे, एजंट,** लक्ष्मीरोड, पुणें. २

अप-टु-डेट शिलाई करतां

**महिंद्रकर ब्रदर्स यांचेकडे चौकशी करा**

बुधवार चौक, पुणें १२ तासांत कपडे शिवून मिळतील. [ खादी भांडाराचे माडीवर

**फराडकर टेलर्स ॲकॅडिमी**

( सिटी पोस्टासमोर पुणें २ )

येथें शिवणकलेचें शास्त्रीय व व्यावहारिक धंदेशिक्षण फीसुद्धां सर्व खर्च मिळून फक्त ११० रु. त पूर्ण खात्री होईपर्यंत मिळतें.

**रु. १४,५०० आणि त्याखेरीज नफा.**

वार्षिक हप्ता रु. १७५ भरून दरमहा रु. ४१-१०-८ वीस वर्षेपर्यंत मिळून त्याखेरीज रु. ५०००।– रक्कम व नफा मिळेल. भरलेल्या हप्त्यावर शें. ९ टक्के व्याज.

एम्. कानजी ॲण्ड कंपनी, मॅनेजिंग एजन्टस् एस. सूर्यराव आणि कंपनी, महाराष्ट्राचे मुख्य एजन्टस्

**धी युनिव्हर्सल फायर ॲण्ड जनरल इन्शुअरन्स कंपनी लि.,** लक्ष्मीरोड, पुणें.

**सुप्रसिद्ध संचालक मंडळ** व नामांकित व्यवहारपटु डायरेक्टर असलेल्या एका सुप्रसिद्ध विमा कंपनकिरतां **महाराष्ट्र, कर्नाटक** आणि **गोमांतक** प्रांतांत विमा शास्त्राचा पूर्ण अनुभव असलेल्या गृहस्थांना भरपूर पगार व कमिशनवर नेमणें आहे.

**दि ग्रेट सोशल लाइफ ॲन्ड जनरल ॲशुअरन्स कं. लि.**

**( हेड ऑफिस : जळगांव )**

माहिती मागवा | **चीफ ऑर्गनायझिंग ऑफिस,** गणपती चौक, **पुणें २**




अखिल हिंदुस्थानांत पहिल्या प्रतीचें अत्यंत लोकप्रिय

**झारापकर टेलरिंग कॉलेज**

आप्पा बळवंत चौक, पुणें २

[ माहितीपत्रक मागवा ]

घरच्या घरीं संगीत कलेंत प्राविण्य मिळविण्यास सर्वोत्कृष्ट-सचित्र-सुबोध-माहितीपूर्ण

**संगीत–मार्गदर्शक**

मालेचीं पुस्तकें.

| गायन | हार्मोनियम | दिलरुबा | फिडल् |
| --- | --- | --- | --- |
| किं. ६ आ. | किं. २॥ रु. | किं. १ रु. २ आ. | किं. १ रु. ४ आ. |

व्ही. पी. नें चार आणे जास्त पडतील.

प्रभा संगीत विद्यालय, फर्ग्युसन कॉलेज रोड, पुणें ४.

**सुप्रसिद्ध तुळजाराम मोदी यांचे पेढे व बर्फी वापरा**

मोती चौक : : : सातारा

**S. B. JOSHI & Co.**

ENGINEERS & CONTRACTORS

41 A, Bruce Street, Bombay | 716 Sadashiv Peth, Poona City.

हें पत्र पुणें, पेठ मांबुडी घ. नं. ११५।१ आर्यभूषण छापखान्यांत रा. अनंत विनायक पटवर्धन यांनीं छापिलें, व ... मांबडी घ. नं. १२५।१३, पुणें शहर, येथें प्रसिद्ध केलें.